

देगलूर : स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले.

# स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप

देगलूर : मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाचे औचित्य साधून येथील देगलूर महाविद्यालयात घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयात स्थापन केलेल्या स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन केद्रातर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृतमहोत्सव निमित्त इयत्ता अकरावी बारावी वर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शन वर्गाचे उद्‌घाटन उपजिल्हाधिकारी कुलदीप जगंम यांनी केले होते सुदंर बोंदर, प्रयोजना नेम्मानीवार, पोलिस उपनिरीक्षक कल्पना गिरी, संग्राम पाटील, अनिता देबडवार, शिवानंद सूर्यवंशी, रत्नाकर चिद्रावार, कपिल तोटावार, संतोष वानोळे, डॉ. चंद्रशेखर बाकेवाड यांची व्याख्याने झाली. स्पर्धा परीक्षेत प्रथम मोनिका विश्वनाथ चक्कावार तर द्वितीय क्रमांक कल्पना संजय मडपलवार, वैष्णवी गोपाळ इंदूरकर, स्फुर्ती इरवंत मोखेडे, तृतीय पुजा माधव चिंचोले या गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले.

Scanned with OKEN Scanner